# स्त्री-मुक्ती विषयक विचार

**स्त्रियांच्या दडवणुकीचा अर्थ व कारणे आणि त्यापासून मुक्त होण्याचा उपाय याबद्दलच्या ाही मूलभूत कल्पना मांडण्याचा एक प्रयत्न**

१९७५ या आंतरराष्ट्रीय वर्षात स्त्रीमुक्तीबद्दल चर्चा एका तिव्रतेने सुरू झाली. आणि प्रत्यक्ष काम करण्याच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम सुचविले गेले व काही हाती घेतले गेले. परंतु स्त्री–मुक्तीच्या प्रश्नाकडे वरिष्ठ वर्गीयांच्या दृष्टीकोनातून पाहिले जात असल्याने ह्या चर्चांतून स्त्री–मुक्ती प्रश्नाविषयी गोंधळच माजवला जात आहे. जागतिक डाव्या चळवळीचा जुना अनुभव, व्हिएटनाम व आफ्रिका यामधील क्रांतिकारक मुक्ति-आंदोलनातील लढे, चीनसारख्या नवीन समाजवादी समाजातील अनुभव, आणि पाश्चिमात्य देशातील स्त्रियांच्या लढाऊ चळवळी या सर्वांमधून स्त्रियांच्या दडपणुकीचा अर्थ व कारणे आणि त्यापासून मुक्त होण्याचा उपाय याबद्दल काही मुलभूत कल्पना मांडणे शक्य आहे. तसा प्रयत्न येथे केला आहे.

## स्त्रीच्या दडपणुकीचे स्वरूप

संपत्ती व नोकर यावर सत्ता असलेल्या व त्यामुळे सर्वसाधारण स्त्रियांच्या कष्टमय जीवनातून सुटलेल्या वरिष्ठ वर्गातील मूठभर स्त्रियांखेरीज बाकी सर्व स्त्रियांची विशेष दडपणूक होते.

कामगार वर्गीय स्त्रिया व शेतकरी स्त्रिया दुहेरी रीतीने दडपल्या जातात. **त्या कामगार अथवा कष्टकरी म्हणून दडपल्या जातात आणि शिवाय स्त्रिया म्हणून दडपल्या जातात.** त्या स्त्रिया जर का तिसऱ्या जगातील असतील तर त्या तिहेरी रीतीने दडपल्या जातात. वर्ग, पिळले गेलेले राष्ट्र आणि स्त्रिया म्हणून–असे आपण म्हणू शकू.

स्त्रियांच्या या विशिष्ट दडपणुकीचे स्वरुप पुढील प्रकारचे आहे. **सर्व वर्गविशिष्ठ समाजात श्रमांची लिंगभेदावर विभागणी झालेली आहे. समाजाचे उत्पादनकार्य चालविणे हे पुरुषांचे मुख्य कर्तव्य असते. तर घर व मुले यांची काळजी घेणे हे स्त्रीचे प्रथम कर्तव्य असते.** अनेक समाजात स्त्रिया शारीरिक कष्टाची कामे करत आल्या आहेत, करत आहेत. पण घर ही त्यांची सर्वप्रथम जबाबदारी मानली जात असल्याने सामाजिक जीवनात पूर्ण भागीदारी करण्यापासून त्या वगळल्या जातात. राजकीय नेतृत्व, कलाविषयक कामगिरी, शास्त्रीय शोध, उत्पादक-निर्मितीक्षमता ह्या बाबतीत त्यांना संधी मिळत नाही. आपल्यावर जीवशास्त्रीय मर्यादा आहेत, आपण अबला आहोत, दुर्बल आहोत, आपण अवलंबित आहोत, आपण मुलांना जन्म देणारे असे वेगळ्या प्रकाराचे प्राणी आहोत, मातृत्वाचे वैभव हे आपल्यासाठी आहे पण उत्पादनाची धकाधकी व युद्धाचा धबडगा ह्या आपल्या गोष्टी नव्हेत; आपल्या स्वतःच्या नव्हे तर दुसऱ्यांच्या, म्हणजे आपल्या नवऱ्यांच्या व मुलांच्या कमाईमधून आपल्या जीवनाची परिपूर्णता व्हावयाची आहे असे त्यांना जन्मापासून शिकवले जाते. बहुतेक समाजात त्यांचा पोषाख वेगळा असतो, त्यांची भाषा वेगळी असते आणि त्यांचे धार्मिक विधीही वेगळे असतात.

लिंगभेदावर आधारलेल्या श्रमविभागणीमुळे मुख्यतः पुरुषांना अधिकार प्राप्त होतो. उत्पादनाचे कार्य पुरुष करत असल्यामुळे समाजातील संपत्ती व सत्ता यावर

(पृष्ठ ३४ पहा)

# संपादकीय

१९७९ साल हे संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतर-राष्ट्रीय बालक वर्ष' म्हणून जाहीर केले आहे.

'मुले हीच देशाची खरी संपत्ती आहेत' व 'त्यांच्या विकासाच्या पायावरच राष्ट्राची भावी उभारणी होणार आहे' अशासारखी सुभाषिते ह्या वर्षीही खूप प्रसवतील व ती आपणा सर्वांना अगदी उबग येईपर्यंत ऐकावीही लागतील. खरा प्रश्न आहे तो आपल्या समाजात खरो-खरीच मुलांची काय स्था आहे? मुलांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी समाज कितपत तयार करतो? आणि ती तयार झाल्यानंतर आपली कुवत योग्य तऱ्हेने वापरण्याची किती संधी देतो?

भारतामध्ये १९५१ साली तेरा साडेतेरा कोटी बालके होती ती आज जवळपास पंचवीस कोटी बालके आहेत. दरवर्षी जवळ जवळ दीड कोटी नवे जन्म होतात. परंतु त्यातील दरहजारी १५० मुले पहिल्या वर्षातच मृत्यूमुखी पडतात.

ज्या देशात ग्रामीण भागातील ४० टक्के कुटुंबे आणि नागरी भागातील ५० टक्के कुटुंबे दारिद्र्य रेषे-खाली राहतात, हालाखीचं उपासमारीचं जिणं जगतात, त्या देशातील मुलांच्या आरोग्याची पातळी निकृष्ठ असल्यास नवल नाही.

दारिद्र्य, उपासमार, अनारोग्य ह्या भोवऱ्यातून निघून शिक्षण घेऊन उमेदीने आयुष्य काढण्याचे भाग्य फारच थोड्यांच्या वाट्याला येते. जी शाळेत जातात तीही नावालाच. बहुसंख्य मुलांना लहानपणापासून घरच्या कामाला हातभार लावावा लागतो. काम करावं लागतं. त्यांना कुठली शाळा आणि कुठलं शिक्षण? ६ ते १४ वया-तील ११ टक्के बालके बालकामगार म्हणून १९७१ च्या खानेसुमारीत नोंदली गेली. खेड्यांमध्ये शेतावर काम करणारी, गुरांच्या मागे जाणारी, शहरामध्ये हमालीकाम करणारी, हॉटेलमध्ये काम करणारी मुले, दुकानावर-काम करणारी मुले इत्यादी ह्यात आली. परंतु ज्यांची नोंद झाली नाही अशी कचरा गोळा करणारी, डबा बाटलीवाल्यांबरोबर हिंडणारी मुले आणि आई वडीलां-ना कामावर जाता यावे म्हणून घरीच ठेवल्या जाणाऱ्या मुली ही सर्व लक्षात घ्यायला हवी.

जे बालवय आनंदानं बागडण्याचे, खेळण्याचे, शिक्षण घेण्याचे आणि कुवत वाढवण्याचे वय त्या वयात उपाशी पोटी अपुऱ्या अन्नावर जगणारी आणि गलिच्छ परिसरात वाढणारी मुले आपण मख्खपणे पाहात राहाणार आहोत काय? ह्याचा विचार सबंध समाजाने करण्याची गरज आहे. राष्ट्राचे भवितव्य ज्यांच्या हातात आहे अशा ह्या बालजनांची आपल्या देशातील आबाळ पाहिली की मन पेटून उठतं.

० ० ०

८ मार्च! आंतर-राष्ट्रीय स्त्री-मुक्ती दिन. ७१ वर्षांपूर्वी ह्याच दिवशी अमेरिकेतील कामगार स्त्रियांनी प्रचंड मोर्चा काढून स्त्री-शक्तीचे दर्शन अमेरिकन समाजास घडविले होते. भांडवलवादी अर्थरचना आणि पुरुषप्रधान संकृतीच्या दुहेरी दडपणाखाली भरडलेली स्त्री आज जागी होऊ लागली आहे. तिला भेडसावणाऱ्या प्रश्नांचा विचार करू लागलेली आहे. आपल्यावरील अन्यायाची दाद मागू लागली आहे. तिच्या व्यक्तिगत समस्या ह्या समाजाच्या समस्यांचा एक अविभाज्य भाग आहेत. ह्याची जाणीव तिला होऊ लागलेली आहे. आपल्या समस्या सोडविण्याकरता संघटनेची आवश्यकता तिला भा[...] लागलेली आहे.

अर्थात अशा तऱ्हेच्या जाणिवा जागृत झाले[...] स्त्री ही आज अल्पसंख्येतच आहे. आठ मार्चचा दिव[...] हा समाजवादी स्त्रीमुक्तीचा विचार अधिकाधि[...] स्त्रियांपर्यंत पोहोचविण्याचा दृष्टीने आणि स्त्रियांच्या मागण्यांवर संघटित आवाज उठविण्याच्या दृष्टी[...] मागणी-दिन म्हणून एकजुटीने पाळण्यात आला पाहि[...]

आपण आपल्या गावाच ८ मार्च दिनाचे काय [...] कार्यक्रम केले ते 'बायजा' ला जरुर कळवावे.

---

**सूचना:**

बायजाकडे आलेले अनाहूत साहित्य पुढील दोन अ[...] प्रसिद्ध न झाल्यास अस्वीकृत समजावे. हे साहित्य हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठवावे ही वि[...]

पर्यंत पोहाचविण्याची जबाबदारी स्वीकारायाच हवी. अर्थात या मर्यादेमध्येही या नियतकालीकाना अतिशय महत्त्वाच्या भूमिका वठवायच्या आहेत. कारण यांचा उगमच आजूबाजूच्या परिस्थितीमुळे तीव्र वैचारिक लढा देण्याची गरज निर्माण झाली असताना झाला आहे.

आज महाराष्ट्रात स्त्रियांची म्हणून जी मासिके आहेत त्यांनी धर्म, अंधश्रद्धा, रुढी, स्त्रीचे अफाट शोषण, तिचे दुय्यम स्थान याविरोधी वैचारिक संघर्ष सुरु केलेला नाही. त्यातल्या कथा, कविता, लेख, त्यांची विविध सदरे यावरून ही मासिके स्त्रीला चार भिंतींच्या आतच अडकवून ठेवणारी आहेत असे स्पष्ट होते. हृया मासिकांमधून स्त्रीच्या व्यक्तिगत, सामाजिक प्रश्नांची अतिशय विकृत मांडणी केलेली असते. याला अपवाद एकट्या स्त्री मासिकाचा आहे. महाराष्ट्राबाहेरही अशीच परिस्थिती आहे. तरुण मुलींना फिल्मी मासिकाचे अतिशय आकर्षण असते. रंगीबेरंगी चित्रे, सवंग मजकूर यामधून तरुण मुलींना त्यांना भोग्यवस्तू असणे किती योग्य, किती चांगले याचे यथासांग 'मार्गदर्शन' केलेले असते ! इतर साप्ताहिकेही स्त्रियांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या भोग्यवस्तू म्हणून चित्रण करत असतात. लोकमाध्यमापैकी नियतकालीके आपल्या पानांपानामधून स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा उदोउदो करत असतात !

दुसरं लोकमाध्यम सिनेमा ! याबाबत तर बोलायलाच नको—चित्रपटांची संख्या वाढते आहे. चित्रपट गृहांची संख्या वाढते आहे. सिनेमा आता ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहोचला आहे. कष्टमय जीवन विसरण्यासाठी, दुःखावर उपाय म्हणून अर्धपोटी राहून का होईना पण ग्रामीण जनता सिनेमाकडे वळते आहे. देवाधर्माचा, रूढी, चमत्कार, स्त्रीच्या देहाचा वापर करून नफा मिळवण्याचा चित्रपट निर्माते प्रयत्न करीत आहेत. त्यातून अंधश्रद्धा, चमत्कार, रुढी याचा जनतेवरील पगडा बळकट केला जात आहे. स्त्रीच्या विकृत चित्रणातून स्त्रीबद्दलच्या विकृत प्रतिमेचा प्रचार होतो आहे. ग्रामीण भागात आरोग्यविषयक सवयींचा फायदा जनतेला होत नाही, औषधात भेसळ होते इत्यादी अडचणींमुळे भगत, बुवा, मांत्रिक याकडे रोगावरच्या उपायासाठी जनता जात रहात आहे. बुवाबाजीवर विश्वास म्हणजे मानवी प्रयत्नांवर, शास्त्रीय प्रगतीवर अविश्वास. अंधश्रद्धेच्या मुळाशी स्त्रीचा केवळ अडाणीपणा आहे असं नाही. स्त्रीला तिच्या आयुष्यात तिचे स्वतःचे शिक्षण, लग्न, कामधंदा हृया कशाचबाबत निर्णय घेण्याची मुभाच नसते. कामाची अशाश्वतता, तोकडी मजुरी, दारिद्र्य व उपासमार यांच्या फेऱ्यात बहुसंख्य स्त्रिया अडकलेल्या आहेत आणि हृया परिस्थितीत बदल घडवून आणणे हे पूर्णतः हाताबाहेर असल्याने जी आगतिकता स्त्रीच्या वाट्यास आलेली आहे. हृया अगतिकतेच्या पोटी ती अंधश्रद्ध बनते. संघटित व सतत प्रयत्नांती आपण ही स्थिती बदलू शकतो हा अनुभवच तिला मानवी प्रयत्नांबद्दल आत्मविश्वास देईल.

हृया पार्श्वभूमीवर ८ मार्चच्या स्त्री-मुक्ती लढ्याचा विचार करायला हवा. स्वतःचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठी सर्व बंधने झुगारून देऊन ८ मार्चला अमेरिकेतल्या स्त्रिया एकत्र आल्या. भारतामध्ये आज सुशिक्षित स्त्रीला ग्रामीण स्त्रीच्या प्रश्नाबाबत उदासीनता आहे. तिचे प्रश्न खऱ्या अर्थाने सुशिक्षित स्त्री समजावून घेऊ शकत नाही. वास्तविक महात्मा फुले, सावित्रीबाई, कर्वे आगरकर यांनी जननिंदा सहन करत, प्रसंगी दगड झेलत स्त्री शिक्षणाचा पाया घातला. आपल्या हाती दिवा दिला तो प्रकाश करण्यासाठी अंधार करण्यासाठी नाही. शिक्षण आणि समाजजीवन नाकारलेल्या स्त्रियांना अंधारकोठडीतून बाहेर काढून त्यांनी प्रकाश दाखविला. आज जर आपण विचार आणि निरिक्षण केले नाही तर आपण आपल्याला परत त्याच अंधारकोठडीत लोटणार आहोत. भारतासारख्या देशात जिथे स्त्रीला गुलाम म्हणून वागवले जाते त्या देशात ८ मार्चला महत्त्व आहे. एक स्फूर्तिदायक संदर्भ आहे. आपण कोठवर आलो, पुढे कसे जायचे, वाटेत किती खाचखळगे आहेत त्याची गंभीर दखल घेण्याचा हा दिवस आहे.

—लता भिसे

—कामकरी स्त्री ही असणार आहे. परंतु आज जातीचा वापर करून शेतमजुरामध्ये फूट पाडली जाते. लढा मोडण्यासाठी जातीचा वापर केला जातो. ग्रामीण भागातल्या कष्टकऱ्यांची एकजूट होण्यासाठी जातिव्यवस्थाविरोधी विचाराचा प्रसार व्हायला पाहिजे. अणि हा प्रचार, या जाणिवा ग्रामीण स्त्री-पर्यंत पोहचण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. स्त्री–मुक्तीचा लढा हा समाज परिवर्तनाच्या लढ्याचा एक भाग आहे. आणि विविध मार्गाने स्त्री–मुक्ती चळवळीमध्ये जातीव्यवस्था आड येते आहे काटेकुटे, खाचखळगे निर्माण करते आहे.

ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे जीवन भयानक आहे. दिवसेंदिवस बेकारी वाढत आहे. अर्ध बेकारीच्या अवस्थेत अनेक स्त्रिया जगत आहेत. शिक्षण नाही, अंधश्रद्धांचा पगडा मोठा आहे, कोणत्याही आरोग्य-विषयक सोयी तिला मिळत नाहीत. किमान वेतनाची अंमलबजावणी होत नाही. दर दोन तीन वर्षांनी दुष्काळ पडत असतो. कृषिविद्यापीठाला संशोधन करण्यासाठी, धरण आणि पाझर तलावासाठी म्हणून अनेक शेत-कऱ्यांच्या जमिनी काढून घेतल्या गेल्या आहेत. यातील अनेक कुटुंबांना शेतमजूर म्हणून बेकार अर्धबेकार अवस्थेत जगावं लागतं आहे. ग्रामीण भागातील बेकारी दूर करण्यासाठी रोजगार हमी योजना महाराष्ट्र शासन राबवत आहे. यासाठी शहरातील कामगारांवर कर लावून ५० कोटीहून जास्त रक्कम शासनाने गोळा केली आहे. पण रोजगार हमी योजनेची कामे काढली जात नाहीत. वास्तविक पाच मैलाच्या आत काम मिळावे. परंतु अलीकडे शासन, जिल्हयात कोठेही कामे काढली तरी जा असे मजूरांना सांगत आहे. पोटासाठी कोठेही जावे लागत आहे. तिथे घर नाही, पाण्याची सोय नाही. भटक्या जमातीतील लोक अजून संघटीत नाहीत. तिथेही स्त्रियांवर अन्याय, अत्याचार सतत होत असतात. ग्रामीण भागातल्या स्त्री-ची ही परिस्थिती तर शहरातील कामगार स्त्रीचे चित्र ही याहून वेगळे नाही. बिडी उद्योग, उदबत्या वळायचे कारखाने, अन्य व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रिया, त्याच बरोबर हमाल स्त्रिया, नगरपालिकेमधल्या सफाई सेविका याही भीषण वास्तवामध्येजगत आहेत. त्यांच्या वेतनाच्या प्रश्नासंबंधात काही प्रमाणात प्रयत्न केला जातो. परंतु आज स्त्री म्हणून त्या स्त्रियांच्या प्रश्नावर संघटित नाहीत. शहरी आणि ग्रामीण भागात स्त्री म्हणून अनेक प्रश्नास स्त्री तोंड देत असते.

भारतातील स्त्री-मुक्ती चळवळ आज अतिशय कम-कुवत आहे. भारतामध्ये फारशा स्त्री संघटना उभ्या राहिलेल्या नाहीत. ज्या काही अस्तित्वात आहेत त्या निरनिराळ्या स्त्रीसंघटना स्वतंत्रपणे कार्य करताना दिसतात. पंतनगर, बैल्लादिल्ला सारख्या घटनात स्त्रियां वर बलात्कार करून दहशत निर्माण करायचा प्रयत्न केला गेला. निरनिराळ्या स्त्री संघटनांनी आपापल्या परीने या घटनांचा निषेध व्यक्त केला. असा प्रयत्न एकत्रित न झाल्याने त्याची ताकद जाणवत नाही. अपेक्षित परिणाम साधत नाही. आज आजूबाजूची परि-स्थिती अशीच आहे की स्त्रियांच्या प्रश्नावर एकत्रीत आवाज देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने स्त्रीसंघटनांनी एकत्र येऊन विचारविनिमय करणे इष्ट ठरेल.

## स्त्री–मुक्तीच्या विचारांचा प्रसार

आज स्त्री – मुक्तीचा विचारही सर्व घरांतील स्त्रियांपर्यंत पोहोचलेला नाही. स्त्रियांच्या प्रश्नांना-अन्यायाला वाचा फोडण्यासाठी, स्त्री-मुक्तीच्या प्रचारासाठी, स्त्रियांच्या जाणिवा विकसित करण्या-साठी वैचारिक साधनाची गरज स्त्री संघटनाना, वाटू लागली आहे. ही घटना उत्साहदायी आहे. 'बायजा' व 'महिला आंदोलन पत्रिका' ही महाराष्ट्रा-तील मराठी नियतकालिके, मुंबईहून निघणाऱ्या फेमिनिस्ट नेटवर्क (इंग्रजी) 'स्त्री संघर्ष' व (हिंदी) ह्या पत्रिका, मानुषी हे दिल्लीहून निघणारे इंग्रजी व हिंदीतले द्वैमासिक यांचा उदय हा भारतातल्या स्त्री-मुक्ती चळवळीचा एक टप्पा आहे असे म्हणता येईल. भारतातील बहुसंख्य स्त्री निरक्षर आहे. त्या स्त्रीपर्यंत ही नियतकालीके पोहोचण्यात अडचण आहे. परंतु आज ग्रामीण भागात स्त्रिया संघटित होऊ लागल्या आहेत. तेथे स्त्रियांच्या प्रश्नावर वाङमय उपलब्ध नाही तिथे मात्र ही नियतकालिके पोहोचायला हवीत. केवळ साक्षर स्त्रीच हे मासिक वाचू शकेल. हया साक्षर स्त्रीने हया मासिकांतील विचार त्यांच्या निरक्षर भगिनीं-

म्हणून क्लारा झेटकीनच्या नेतृत्वाखाली स्त्रियांनी ८ मार्चला तीव्र निषेध केला. जर्मनीचे सरकार खवळले आणि त्यांनी सर्व प्रमुख स्त्री कार्यकर्त्यांना तुरूंगवास दिला. ८ मार्च १९१७ ला तर रशियातल्या कापड कामगार स्त्रियांनी निदर्शनांचा दणका उठवून दिला. रशियन क्रांतीच्या इतिहासात या निर्दशनाना मोठे महत्व आहे.

१९७५–आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून आपल्याकडेही ८ मार्च उत्साहाने साजरा होतो आहे. गेल्यावर्षी मुंबईच्या स्त्रीमुक्ती संघटनेने मुंबईमध्ये सभा घेऊन स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा केली. यामध्ये कामगार स्त्रिया, नर्स, शिक्षिका मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या. पुण्यातल्या महानगरपालीकेच्या सफाई सेविकांनी तर ८ मार्च साजरा करण्यासाठी भांडून हक्कची सुट्टी घेतली. कोल्हापूर मध्येही ग्रामसेविका, नर्स, शिक्षिकांनी एकत्र येऊन ८ मार्च साजरा केला. स्त्रियांच्या अनेक प्रश्नाच्या सोडवणुकीची हालचाल करण्यासाठी याबर्षीचा ८ मार्च 'मागणी दिन' म्हणून साजरा करण्याच्या हालचाली जोरात चालू झाल्या आहेत. महाराष्ट्रातील निरनिराळ्या स्त्रीसंघटना व राजकीय पक्षातील स्त्री कार्यकर्त्यांतर्फे १०–११ फेब्रुवारीला पुण्यात होणारे 'स्त्री-मुक्ती आंदोलन ८ मार्च चर्चा सत्र' हा त्याच्याच पूर्वतयारीचा एक भाग आहे.

## वाढती अस्मिता–वाढते हल्ले

सध्या देशात सत्तेची भांडणे विकोपाला गेलेली आहेत. सत्तेच्या भांडणात कष्टकरी वर्गावरचे हल्ले वाढतच आहेत. कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांच्या मागण्यांच्या चळवळी दडपण्याचे प्रयत्न विविध मार्गांने चालू आहेत. कामगार, कष्टकरी वर्गांवरच्या हल्ल्यांची एक सलग मालिकाच आपल्याला दिसून येते. बेलछीचं हत्याकांड, पंतनगरच्या कृषिविद्यापीठात किमान वेतन मागणाऱ्या शेतमजुरांवरचा गोळीबार त्यामध्ये अनेक मजुरांचे बळी, स्त्रियांवरचा बलात्कार, शरीरिक छळ, बैलादिल्लाच्या खाणीवर पुन्हा हीच गोळीबाराची, बलात्काराची पुनरावृत्ती. कानपूरच्या स्वदेशी मीलमध्ये गोळीबारात अनेक कामगार ठार झाले. अशा किती घटना घडत आहेत. वेठबिगारी अजूनही आस्तित्वात असल्याबद्दल सतत उजेडात येणारी माहिती, अहवाल! किमान वेतनाची अंमलबजावणी करायला नकार देणारे सधन शेतकरी! ट्रेड युनियन विषयक नवा कायदा मांडून कामगारांचे मूलभूत हक्क नाकारणारे औद्योगिक संबंधविषयक बिल! कामगारांवर गुंडांचे हल्ले होत आहेत! पोलिसांची दहशत आहेच! या सर्वाबरोबरच जातीय हल्लेही वाढलेले आहेत. दलितांचे खून, दलित स्त्रीवर बलात्कार, दलितांना दमबाजी या प्रकाराबरोबरच दलितांवरचे सामूहीक हल्लेही वाढत आहेत. त्यांच्या वस्त्या जाळणे, दलितांना जाळून मारणे असे प्रकार वाढले आहेत. बेलछी, आग्रा, बाजितपूर, मराठवाडा या घटना काय सांगून जातात? देशातल्या आर्थिक संघर्षाबरोबर जातीय संघर्षही परकोटीला पोहोचलेला आहे, आणि कामगार कष्टकरी वर्गाचा एक अविभाज्य भाग म्हणून स्त्रियांना या भीषण वास्तवाला सतत सामोरे जावे लागत आहे.

८ मार्चला या सगळ्याची गंभीर नोंद आपल्याला घ्यावी लागणार आहे. भारतातील स्त्री-मुक्तीचा कणा कष्टकरी स्त्री आहे. कष्टकरी स्त्रीमध्ये दलित स्त्रियांचे प्रमाण मोठे आहे. दलित स्त्रीच्या आजूबाजूची परिस्थिती भयानक आहे. तिला सर्व प्रकारचे सामाजिक जीवन नाकारणारी आहे. दलितासाठी पाण्याची विहीर वेगळी असते. या विहिरीचे पाणी आटले की तिला २।२ मैल लांब जावे लागते. दलित वस्त्यांना नाही पाण्याची सोय, सांडपाण्याची सोय की विजेची सोय! बहुसंख्य दलित स्त्री निरक्षर आहे. दलित स्त्रीला सतत असुरक्षित जीवन जगावे लागते. कारण ती आहे कष्टकरी वर्गाची प्रतिनिधी, युगानयुगे वाळीत ठेवलेल्या अस्पृश्य समाजाची आणि तिसरे म्हणजे स्त्री. तीनही कारणामुळे या स्त्रीचे प्रचंड शोषण चाललेले असते. स्वतंत्र्योतर काळात झालेल्या अस्पृश्यता विरोधी कायद्याचा फायदा तिला मिळत नाही. कारण जातीयवादी आधिकारीच या कायद्याची अमलबजावणी करण्यसाठी आहेत. स्त्री संघटनांनी जातीव्यवस्थेविरोधी वैचारिक लढा देण्याची आज तीव्र गरज निर्माण झाली आहे. स्त्री–मुक्तीची चळवळ ही फक्त दलित स्त्रियांची नाही. त्यामध्ये सवर्ण शेतमजुर